अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा.क्र : अनिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ ६२९२
दिनांक : २४/१२/२०२०

## - कार्यालय परिपत्रक –

विषय :- उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (वर्ग-१) या पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देणेकामी अर्ज मागविणेबाबत.

संदर्भ :-

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएमसी ३०१४/ प्र.क्र.०२/नवि-२२, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४.
२. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएमसी ३०१९/ प्र.क्र.१०८/नवि-२२, दिनांक ०३ ऑगस्ट, २०२०.
३. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे पत्र क्रमांक :- पीएमसी-२०२०/प्र.क्र.२१५/नवि-२२, दि. ३०/०९/२०२०.
४. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/३८४, दि. २७/१०/२०२०.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ व पुणे महानगरपालिकेच्या सुधारित आकृतीबंधास संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील "उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी" (वर्ग-१) हे पद पुणे महानगरपालिकेच्या शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचेमधून तदर्थ पदोन्नतीने भरणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र. ४ चे ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर मान्यतेनुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील कार्यरत कर्मचाऱ्यामधून जे अधिकारी / कर्मचारी संदर्भ क्र. २ चे शासन निर्णयामध्ये नमूद केलेली उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (वर्ग-१) ७५% पदोन्नती या पदासाठी आवश्यक असणारी खालील शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा अधिकारी / कर्मचारी यांची माहिती खातेप्रमुख यांचेमार्फत विहित नमुन्यामध्ये मागविण्यात येत आहे. विहित अर्जाचा नमुना या सोबत जोडला आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १२० | लेखा सेवा श्रेणी -१ | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महसूल/खर्च) | नामनिर्देशन (२५%) | १) सनदी लेखापाल (सी.ए.) किंवा (आय.सी.डब्ल्यू.ए.)<br>२) अनुभव : सरकारी / निमसरकारी / खाजगी संस्थेतील कामाचा ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती (७५%) | उप मुख्यलेखा व वित्त अधिकारी या पदाच्या सरळसेवेकरिता निश्चित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यामधून (सी.ए. ला प्राधान्य/आय.सी.डब्लू.ए.) निवड प्रक्रियेने पद भरण्यात यावे. |